**<u>रे.दि.मु.नं.१६४/२००६ मधील नि.७८ वरील आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) थोडक्यात वादी यांचे कथन असे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुद्ध मुळ खरेदीपत्रात पुरवणी चुक दुरुस्तीचा रजिष्टर लेख करुन देण्याबद्दल व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. गट नं. ३२० मधील वादीचे मालकीचे ४० आर क्षेत्र वजा जाता उत्तरेकडील उर्वरीत ५७ आर क्षेत्र हे प्रतिवादी नं.३ व ४ यांचे ताब्यात असुन प्रतिवादी हे वादीचे वहिवाटीस हरकत व अडथळा निर्माण करण्याचे उद्देशाने प्रतिवादी नं.३ व ४ वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस उत्तर बाजुचे बांधावरुन वाद निर्माण करण्याची दाट शक्यता वादीस आहे. अशा परिस्थितीत वादीचे मालकीचे गट नं.३२० मधील ४० आर क्षेत्राची हद्द ठरवुन मागणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सदर दाव्यातील वादी प्रतिवादी यांचेतील वाद पुर्णपणे संपुष्टात येण्यासाठी वादी आपले गट नं.३२० मधील ४० आर क्षेत्राची मोजणी करुन हद्दी कायम करण्याची मागणी सदर दाव्यात मागत आहे. तरी दावा कलम १० नंतर १०(अ) व दावा कलम १३ (ब) नंतर १३ (ब) (१) यामधील अर्जात नमुद केलेप्रमाणे मजकुर समाविष्ट करणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी.

३) सदर अर्जावर प्रतिवादी नं.३ यांनी आपले म्हणणे नि.९० प्रमाणे दाखल केले. सदरचा अर्ज कायदयाने चालु शकत नाही. यामध्ये कुठलाही subsequent event घडलेला नाही. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात

आमुलाग्र बदल होत असल्याने अशी दुरुस्ती दाव्यामध्ये झालेल्या चुका भरुन काढता येत नाही. वादीने सदरचा दावा लबाडीने १९९२ मध्ये केलेले खरेदीपत्र देणार गट नं.३२१ मधील उत्तरेकडील ४० आर क्षेत्राचे असताना व याच नंबर मधील दक्षिणेकडील ३४ आर क्षेत्र हे प्रतिवादी नं.४ हिने दि.९.९.२००३ रोजी खरेदी घेतले व ते वादीस मिळाले नाही म्हणुन चिडुन जावुन गट नं.३२१ मधील क्षेत्र घेतले नसुन ३२० मधील घेतले आहे असे लबाडीने भासवुन ९२ चे खरेदीपत्र दुरुस्त करुन मिळावे म्हणुन सदरचा दावा दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा प्रामाणिकपणाचा नसल्याने तो नामंजुर करणेत यावा व मंजुर करावयाचे झाल्यास खर्च रुपये २०००/— वादीने प्रतिवादीस देणेत यावेत.

४) प्रस्तुत अर्जावर वादी व प्रतिवादी वकिलांचे म्हणणे ऐकले. दाव्याचे अवलोकन केले. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता सदरचा दावा हा वादीने पुरवणी चुक दुरुस्तीचा रजिष्टर लेख करुन देण्याबद्दल व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्याअनुशंगाने सदरची दुरुस्ती कायदेशीरदृष्टया आवश्यक अशी बाब आहे. तसेच दाव्याचा अंतिम निर्णय गुणावगुणावर होणेकामी सदरची दुरुस्ती गरजेची आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करणे उचित होणार आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. तरी मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

## आदेश

१) सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) वादींनी अर्जातील विनंतीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कालबद्धतेनुसार करावी व त्याप्रमाणे दुरुस्तीची प्रत

त्वरीत दाखल करावी.

(दि. ह. दाभाडे)

१८/०२/२०१६

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर
वाई.